• वर्ष : ०३ • अंक : २१९ • पुणे • गुरुवार, दि. ३० एप्रिल २०२६ • मराठी दैनिक •पाने ४ •किंमत : २ रूपये •RNI No.-MAHMAR/2023/89313




# दैनिक आरंभपर्व

आरंभ एका नव्या पर्वाचा

Epaper : www.aparv.com

डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे पुण्यातील लोकप्रिय दैनिक





‘... तर आपल्या पक्षाचा विस्तार वेगाने करणे हेच उद्दिष्ट’ 3



‘झेंडा मराठीचा... मराठी भाषेच्या... मराठी कर्तृत्वाचा’ 4

## ठळक बातम्या

### १ मे पासून ‘हर घर दस्तक’ मोहीम

मुंबई (आरंभ पर्व) : तुमच्या घरात काही जुने पुराणे कागदपत्र वस्तू आहेत का? तुमच्या आई वडिलांनी आजी आजोबांनी, खापर पणजोबाने माळ्यावर काही जपून ठेवले आहे का? तुमच्या गावात असे काही पुरातन आहे का? मग एक मे पासून त्याची नोंदणी करा. हस्तलिखित दस्तऐवजांच्या स्वरूपात असलेला ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा जतन करण्याच्या उद्देशाने केंद्र शासनाने डिजिटल नोंदणीचा उपक्रम सुरू केला आहे. या नोंदणीसाठी ‘हर घर दस्तक’ ही विशेष मोहीम हाती घेण्यात येत आहे. या मोहिमेच्या निमित्ताने राज्यातील हस्तलिखित दस्तऐवजांच्या ऑनलाईन नोंदीतून सांस्कृतिक वारसा जगासमोर आणा, असे आवाहन सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड आशिष शेलार यांनी केले आहे.

### केसकर मृत्यू प्रकरणाला नवे वळण

पुणे (आरंभ पर्व) : केडगाव प्राथमिक आरोग्य केंद्रातील रंजना केसकर मृत्यू प्रकरणाला आता वेगळे वळण लागले आहे. रंजना केसकर यांच्या पोटात रक्तस्त्राव होऊ लागल्यामुळे प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांना तत्काळ वरवंड येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. ही सर्व प्रक्रिया शासनामार्फत होणे अपेक्षित होते. मात्र, खासगी रुग्णालयात केसकर यांच्यावर करण्यात आलेल्या उपचाराचे पैसे केसकरांच्या नातेवाईकांना भरण्यास भाग पाडल्याचे समोर आले आहे. हे प्रकरण उघडकीस येताच संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्यांनी बुधवारी त्या नातेवाईकांचे पैसे परत केले.

### संजय राऊतांचा खळबळजनक आरोप

पुणे (आरंभ पर्व) : ‘पश्चिम बंगालसारख्या राज्यात ममता बॅनर्जी यांच्यासारखे खंबीर नेतृत्व असताना त्यांच्या पराभवासाठी अडीच लाख पॅरा मिलिट्री फोर्स पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी पश्चिम बंगालमध्ये नेऊन ठेवली आहे. साम, दाम, दंड, भेद याचा वापर होतोय. हा प्रशासकीय, निवडणूक आयोगाचा दहशतवाद असून, ही अत्यंत गंभीर गोष्ट देशाच्या लोकशाहीत घडतेय. निवडणूक आयोग सत्ताधारी पक्षाला मदत व्हावी म्हणून दहशतवादाचा अवलंब करतोय’, असा आरोप उद्धवसेनेचे नेते आणि खासदार संजय राऊत यांनी पत्रकार परिषदेत केला. ‘पुण्यात, पिंपरी-चिंचवडला काय झालं, याच पद्धतीने निवडणुका लढण्यात आल्या. कोणत्या परिस्थितीत महाराष्ट्रात निवडणुका झाल्या आणि होतायत हे मी तुम्हाला सांगायला नको. आम्ही लढणारे लोक आहोत’, असे संजय राऊत म्हणाले. ‘एन्काऊंटर स्पेशलिस्टवर निवडणुका जिंकण्याची गरज नरेंद्र मोदींसारख्या लोकप्रिय नेत्याला का भासावी?, पंतप्रधान नरेंद्र मोदी हे जगाचे नेते आहेत. अंतराळात राजकारण सुरू झाले तर ते तिथले नेते होतील. जोडीला अमित शाह आहेतच. तरीही त्यांना पोलिस फोर्स नेऊन लोकांना धमक्या देऊन निवडणुका जिंकण्याची वेळ येत आहे. याचाच अर्थ त्यांना पराभव दिसतोय.

# बनावट नोटांचे ‘सांगली कनेक्शन’

## कोल्हापूर, मुंबईतील सहा संशयितांना सावंतवाडीत पोलीस कोठडी

**सावंतवाडी (दै. आरंभ पर्व)**

सावंतवाडी शहरातील एका बँकेत भरण्यात आलेल्या २०० रुपयांच्या बनावट नोटांच्या प्रकरणाचा छडा लावण्यात पोलिसांना यश आले असून, या गुन्ह्याचे धागेदोरे सांगलीपर्यंत पोहोचले आहेत. सांगली कारागृहात असलेल्या सहा संशयित आरोपींना सावंतवाडी पोलिसांनी ताब्यात घेऊन अटक केली आहे. आज त्यांना न्यायालयात हजर केले असता, दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. काही दिवसांपूर्वी सावंतवाडी येथील एका बँकेत रोख रक्कम भरण्यात आली होती. या रकमेची तपासणी करताना २०० रुपयांच्या ८ नोटा बनावट असल्याचे बँकेच्या निदर्शनास आले. याप्रकरणी बँक व्यवस्थापकांनी दिलेल्या तक्रारीनुसार सावंतवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलिसांनी या नोटांच्या सिरीजचा (सीरियल नंबर) बारकाईने तपास सुरू केला. तपासादरम्यान सावंतवाडीत सापडलेल्या बनावट नोटांची सिरीज आणि सांगली




शहरातील महात्मा गांधी चौक पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या एका गुन्ह्यातील जप्त नोटांची सिरीज एकच असल्याचे समोर आले. या तांत्रिक पुराव्यावरून सावंतवाडी पोलिसांनी सांगली येथील न्यायालयात धाव घेतली आणि न्यायालयाच्या आदेशाने सांगली कारागृहातून सहा आरोपींना ताब्यात घेतले. सावंतवाडी पोलिसांनी अटक केलेल्या संशयितांमध्ये सुप्रीत कडप्पा देसाई (वय २२, रा. कोल्हापूर),राहुल राजाराम जाधव (वय ३३, रा. कोल्हापूर),इब्रार आदम इनामदार (वय ४४, रा. कोल्हापूर), नरेंद्र जगन्नाथ शिंदे (वय ४०, रा. कोल्हापूर), संदीप बाळू कांबळे (वय ३८, रा. कोल्हापूर), सिद्धेश जगदीश म्हात्रे (वय ३८, रा. मालाड-मुंबई) यांचा समावेश आहे. पोलीस निरीक्षक अमोल चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक पंकज शिंदे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत. या टोळीने कोकणात आणखी कोठे अशा नोटा चलनात आणल्या आहेत का, याचा शोध आता पोलीस घेत आहेत.

> सांगली येथून ताब्यात घेतल्यानंतर या सर्व आरोपींना काल सोमवारी रात्री उशिरा सावंतवाडी पोलीस ठाण्यात अधिकृतपणे अटक करण्यात आली. आज त्यांना सावंतवाडी न्यायालयात हजर करण्यात आले असता, न्यायालयाने त्यांना दोन दिवस पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत.

# अल्यूमिनियम धातूची चोरी करणारी टोळी जेरबंद; पोलीसांची कारवाई

**अलिबाग (दै. आरंभ पर्व)**

रसायनी येथील हिरानंदानी फॉरच्युन सिटी येथून दोन टन वजनाच्या अल्यूमिनीयम धातूच्या सेंटरींग प्लेट चोरीला गेल्या होत्या. या प्रकरणी रसायनी पोलीसा ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. पोलीसांनी २४ तासात तपास करून आरोपी टोळी जेरबंद केली आहे. रसायनी येथील हिरानंदानी फॉरच्यून सिटी येथून २५ एप्रिल २०२६ पहाटे तीनच्या सुमारास दहा ते बारा जणांनी २ टन वजनाच्या अँल्युमिनीयम धातूच्या साडे सहा लाख रुपये किमतीच्या सेंटरीग प्लेट चोरीला गेल्या होत्या. या प्रकरणी रसायनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. घटनेची दखल घेऊन रसायनी पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी अभिजीत भुजबळ आणि त्यांचे सहकारी घटनास्थळी दाखल झाले त्यांनी तपास सुरू केला. मुंबई पुणे जुने महामार्गावरील घटनास्थळाचे दोन्ही बाजुकडील सीसीटीव्ही फुटेज पडताळणी केली त्यात संशयीत टेम्पो दिसून आला. त्यानंतर शेडुंग टोल नाका येथे सदर टेम्पोचे सीसीटीव्ही फुटेज पडताळणी केले असता त्या ठिकाणी टेम्पोची नंबर प्लेट दिसु नये या पद्धतीने काळी केलेली असल्याचे



दिसून आले. टोल नाक्याचे सिस्टीममध्ये दिलेला नंबर देखील चुकीचा दाखवित होता. त्यामुळे तपास अत्यंत क्लिष्ट व गुंतागुतीचा होत होता. सीसीटीव्ही चे तांत्रीक विश्लेषण व गोपनिय बातमीदार यांचा वापर करून गुन्ह्यात वापरलेल्या टेम्पोचा शोध घेतला असता सदरचा टेम्पो सीबीडी बेलापुर येथील असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर सीबीडी बेलापुर रेल्वे स्टेशन परिसरामध्ये सापळा रचुन शिताफीने टेम्पो व त्यावरील टेम्पोचा चालक यास ताब्यात घेतले. त्यानंतर त्याच्या साथीदारांना ताब्यात घेण्यात आले. चोरीला गेलेला सर्व साडे मुद्देमल पोलीसांनी जप्त केला आहे. विकास रामपाल वाल्मिकी वय. 26 वर्षे, रा. सीबीडी बेलापुर, आताउल्ला उर्फ यासीन अमजलअली खान, वय. 25 वर्षे, रा. पळस्पे पनवेल अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत.

# आता ओला, उबर, रॅपिडोसाठी सरकारी दर...

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

‘ओला’, ‘उबर’, ‘रॅपिडो’ या ॲग्रिगेटर कंपन्यांनी केवळ सरकारमान्य दराने भाडे आकारण्याचा आदेश प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडून देण्यात आले. ओला, उबर, रॅपिडो या ॲग्रिगेटर कंपन्यांकडून मनमानी पद्धतीने भाडे आकारण्यात येत होते. त्यामुळे रिक्षाचालकांचे नुकसान होत असल्याचा आरोप विविध रिक्षा संघटनांच्या वतीने करण्यात येत होता. मीटरच्या दराने, की ॲग्रिगेटर कंपन्यांच्या दरानुसार भाडे आकारणी करायाची, या गोंधळामुळे रिक्षाचालक आणि प्रवाशांमध्ये वादाचे प्रसंग उद्भवत होते. त्यानंतर प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडून रिक्षा संघटना आणि ॲग्रिगेटर कंपन्यांची बैठक बोलावण्यात आली. प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत ॲग्रिगेटर कंपन्यांना सरकारमान्य दराने भाडे आकारण्याचे आदेश देण्यात आले.



एकूण भाडेदराच्या किमान ८० टक्के रक्कम चालकाला मिळेल, याची दक्षता घेण्यात यावी व त्यानुसार आपल्या ‘ॲप बेस प्रणाली’मध्ये सुधारणा करण्यात यावी आणि त्याचा अहवाल प्राधिकरणासमोर सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. दरम्यान, प्राधिकरणाने दिलेल्या आदेशांचे पालन न करणाऱ्या ॲग्रिगेटर कंपन्यांवर दंडात्मक कारवाई करण्यात येणार असल्याचे प्रादेशिक परिवहन अधिकारी अर्चना गायकवाड यांनी निवेदनाद्वारे कळविले.

# रिक्षाचालकांसाठी मराठी सक्ती लांबणीवर; सरनाईक यांची माघार

## १५ ऑगस्टपर्यंत मुदत

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

महाराष्ट्र दिनापासून राज्यातील रिक्षा, टॅक्सी चालकांना मराठी अनिवार्य करण्याच्या निर्णय लांबणीवर टाकण्याची वेळ परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्यावर मंगळवारी आली. महाराष्ट्र दिनापासून ते १५ ऑगस्ट पर्यंत ( १०० दिवस) मराठीच्या ज्ञानाबाबत विशेष पडताळणी मोहिम राबविण्यात येणार आहे. ‘राज्यात व्यवसाय करायचा असेल तर मराठी भाषा येणे आवश्यक आहे’ असा इशारा सरनाईक यांनी दिला आहे.

राज्यातील रिक्षा, टॅक्सी चालकांना मराठी भाषा अनिवार्य करण्याच्या सरनाईक यांच्या निर्णयापासून वाद निर्माण झाला. या वादावर तोडगा काढण्यासाठी सोमवारी मंत्रालयात रिक्षा, टॅक्सी चालक संघटना व या निर्णयाला विरोध करणारे संजय निरुपम, शशांक राव यांची एक बैठक झाली. चिघळत चालणाऱ्या या वादावर तोडगा जाहीर न करता सरनाईक यांनी मंगळवारी (२८ एप्रिल)



राज्यातील सर्व प्रादेशिक परिवहन विभाग (आरटीओ) अधिकाऱ्यांची बैठक आयोजित केली होती. अधिकाऱ्यांच्या या बैठकीनंतर सरनाईक यांनी एक पाऊल मागे घेतले.

१ मे पासून ‘मराठी अनिवार्य’ ची अंमलबजावणी न करता १५ ऑगस्ट पर्यंत असे एकूण १०० दिवस अमराठी रिक्षा, टॅक्सी चालकांसाठी विशेष मोहिम राबविण्यात येणार आहे. अतिरिक्त आयुक्त रविंद्र गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली चार सदस्य समिती स्थापन करण्यात आली आहे. ही समिती या मोहिमेचे नेतृत्व करणार आहे. या समितीच्या अहवालानंतर धोरणात्मक निर्णय घेतला जाणार आहे.

राज्यातील ५९ आरटीओ विभागांना १ मेपासून विशेष तपासणी मोहीम राबविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या अंतर्गत नियमांचे उल्लंघन करणाऱ्या तसेच बेकायदेशीर वाहतूक करणाऱ्या चालकांवर कडक कारवाई केली जाईल. मराठी भाषा येत नाही या कारणावरून परवाना रद्द केला जाणार नाही. ही कारवाई इतर तरतुदींनुसार केली जाईल. मीरा-भाईंदर येथे एकूण ३४४३ रिक्षांची विशेष तपासणी करण्यात आली होती. त्यापैकी ५६५ चालकांना मराठी भाषेचे ज्ञान सिद्ध करता आले नाही. या चालकांनी मराठी भाषा शिकण्याची तयारी दर्शविली आहे. अमराठी रिक्षा, टॅक्सी चालक मराठी शिकण्यास तयार आहेत असे त्यांनी सांगितले.

### सरनाईक एकाकी

रिक्षा चालकांसाठी मराठी सक्तीची करण्याचा निर्धार सरनाईक यांनी केला होता. पण त्याला रिक्षा चालकांच्या संघटनांकडून विरोध झाला. सरनाईक यांच्या शिवसेनेतील संजय निरुपम यांनी विरोधी भूमिका घेतली. सरनाईक यांच्या समर्थनार्थ शिवसेना शिंदे गटातील एकही नेता पुढे आला नाही. मराठी सक्तीचा चर्चेत नसलेला मुद्दा सरनाईक यांनी प्रतिष्ठेचा केल्याने भाजपमध्येही अस्वस्थता होती. सर्व बाजूने विरोध सुरू झाल्याने शेवटी सरनाईक यांचाही नाईलाज झाला. एकूणच मराठी सक्तीच्या मुद्द्यावर सरनाईक हे एकाकी पडल्याचे चित्र होते.

# आज नृसिंह जयंती : विष्णूंनी घेतला होता अवतार

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

आज (गुरुवार, 30 एप्रिल) भगवान विष्णूंच्या चौथ्या अवताराचे, भगवान नृसिंहाचे प्रकट उत्सव आहे. वैशाख महिन्याच्या शुक्ल पक्षातील चतुर्दशी तिथीला हा उत्सव साजरा करतात.

आंध्रप्रदेशातील सिंहाचलम येथील श्री वराह लक्ष्मी नृसिंह स्वामी देवस्थानममध्ये स्थापित भगवान नृसिंह वर्षभर चंदनाने झाकलेले असतात. वर्षातून फक्त एकदाच त्यांच्या वास्तविक स्वरूपाचे दर्शन अक्षय तृतीयेला होते. अशी मान्यता आहे की, देवाचे उग्र स्वरूप शांत ठेवण्यासाठी त्यांना चंदनाचा लेप लावला जातो. वैशाख शुक्ल चतुर्दशीला भगवान विष्णूंनी आपल्या उग्र रूपात नृसिंह अवतार घेऊन भक्त प्रल्हादाचे रक्षण केले होते आणि हिरण्यकश्यपूचा वध केला होता. पौराणिक कथा अशी आहे की, या ठिकाणी भगवान नृसिंह प्रकट झाले होते. भक्त प्रल्हादाच्या प्रार्थनेनंतर भगवान वराह आणि नृसिंह अवतारात येथे विराजमान झाले. श्री वराह लक्ष्मी नृसिंह स्वामी मंदिरात भगवान त्रिभंगी मुद्रेत विराजमान आहेत, म्हणजेच मानवी धडावर सिंहाचे डोके आहे. मंदिरात 16 खांबांचा नाट्यमंडप आणि 96 खांबांचा कल्याणमंडप आहे. नृसिंह प्रकट उत्सवावर भक्त दिवसभर उपवास करतात



आणि नृसिंहजींची विशेष पूजा करतात, देवाला चंदनाचा लेप लावला जातो. अशी मान्यता आहे की या व्रत-पूजेमुळे भक्तांच्या सर्व अडचणी दूर होतात, भय, रोग, शत्रू आणि तणावातून मुक्ती मिळते. नृसिंह जयंतीला व्रत-पूजा करण्यासोबतच दान करण्याचेही विशेष महत्त्व आहे. शास्त्रानुसार या दिवशी श्रद्धेनुसार धान्य, पाणी, तीळ, वस्त्र, धन, छत्री दान करावी. सध्या उन्हाळ्याचे दिवस आहेत, त्यामुळे एखाद्या मंदिरात भक्तांसाठी पिण्याच्या थंड पाण्याची व्यवस्था करू शकता. असे मानले जाते की या दिवशी केलेले दान अनेक पटींनी फळ देते आणि व्यक्तीच्या जीवनातील दुःख दूर होतात.

नृसिंह जयंतीची मुख्य पूजा सूर्यास्ताच्या वेळी केली जाते, कारण सूर्यास्ताच्या वेळीच भगवान नृसिंह हिरण्यकश्यपूचा वध करण्यासाठी प्रकट झाले होते.

नृसिंह भगवानांच्या पूजेमध्ये तांदळाच्या आसनावर कलश स्थापित केला जातो आणि भगवान नृसिंहची प्रतिमा किंवा चित्र विराजमान केले जाते. यानंतर पंचामृत, दूध आणि गंगाजलाने भगवानांचा अभिषेक केला जातो. भगवानांना पिवळी वस्त्रे अर्पण करणे शुभ मानले जाते. पूजेमध्ये चंदन, तांदूळ, फुले, तुळशीची पाने आणि धूप-दीपाचा वापर केला जातो. ज्या लोकांच्या कुंडलीत गुरु ग्रहाशी संबंधित दोष आहेत, त्यांनी गुरुवार आणि नृसिंह प्रकट उत्सवाच्या योगात गुरु ग्रहाची विशेष पूजा देखील करावी. गुरु ग्रहाची पूजा शिवलिंग रूपात केली जाते, म्हणून शिवलिंगाची पूजा करावी. शिवलिंगावर चंदनाचा लेप लावावा. बेलपत्र, धोतरा, रुईची फुले, गुलाब, पिवळी फुले, हरभऱ्याची डाळ, तांदूळ आणि इतर पूजा सामग्री अर्पण करावी. ॐ नमः शिवाय, ॐ ब्रह्म बृहस्पतये नमः या मंत्राचा जप करावा. भगवानांना बेसनाचे लाडूंचा नैवेद्य दाखवावा.



# '... तर आपल्या पक्षाचा विस्तार वेगाने करणे हेच उद्दिष्ट'

## केंद्रीय राज्यमंत्री व आरपीआयचे अध्यक्ष रामदास आठवले यांचे प्रतिपादन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

रिपब्लिकन पक्षाच्या सर्व गटांनी आणि आंबेडकर चळवळीतील सर्व घटकांनी एकत्र यावे, यासाठी आंबेडकरी समाज आसुसलेला आहे. त्यासाठी आपण अनेकदा प्रयत्न केले आहेत. मात्र, एकत्रीकरण होणारच नसेल तर आपल्या पक्षाचा वेगाने विस्तार करणे हेच आपल्या समोरचे उद्दिष्ट आहे, असे प्रतिपादन केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री आणि रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष रामदास आठवले यांनी पत्रकार परिषदेत केले. यावेळी शहराध्यक्ष संजय सोनवणे, उपमहापौर परशुराम वाडेकर, मातंग आघाडीचे प्रदेश अध्यक्ष अण्णा वायदंडे, मोहन जगताप, शाम सदाफुले, बसवराज गायकवाड, शशिकला वाघमारे, प्रवीण ओव्हाळ, विशाल शेळके, राजेश गाडे, ऋषिकेश गवळी, संजय खडसे, सुनिल जाधव, सुधीर वाघमोडे आदी उपस्थित होते. रिपब्लिकन पक्ष हा सर्व समाज घटकांना एकत्र जोडणारा पक्ष आहे. पक्षाला राष्ट्रीय पक्ष म्हणून मान्यता मिळवून देण्यासाठी आपण प्रयत्नशील आहोत. छत्रपती संभाजीनगरमधील सामाजिक कार्यकर्ते रमेश अण्णा मुळे यांनी रिपब्लिकन पक्षात प्रवेश केला असून; त्यांच्यावर पक्षाच्या मराठा आघाडीच्या अध्यक्षपदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. त्यांच्या माध्यमातून मराठा आणि दलित समाजाला एकत्र जोडण्याचे पक्षाचे प्रयत्न असतील, असेही आठवले यांनी स्पष्ट केले. स्वातंत्र्योत्तर काळात समाजात उल्लेखनीय परिवर्तन झाले आहे. संविधानामुळे समाज एकसंध राहिलेला आहे. त्यामुळेच भारतात नेपाळ किंवा बांगलादेशसारखी अराजकाची स्थिती केव्हाही निर्माण होऊ शकत नाही. मात्र, सामाजिक स्तरावर जातीभेद उठावदारपणे दिसत नसले तरी देखील अद्यापही काही ठिकाणी दलितांवर अत्याचाराच्या घटना घडत आहेत. त्यामुळे संपूर्ण परिवर्तनासाठी देशातील प्रत्येक नागरिकांनी पुढाकार घेणे गरजेचे आहे, अशी अपेक्षा आठवले यांनी व्यक्त केली. आम्ही देशभरात पक्षविस्तारासाठी प्रयत्नशील असलो तरीही महाराष्ट्रात रिपब्लिकन पक्षाला सत्तेत पुरेसे प्रतिनिधित्व मिळालेले नाही, अशी खंत व्यक्त करताना आठवले यांनी विधान परिषदेची एक जागा, दोन महामंडळाचे अध्यक्षपद आणि विविध महामंडळामध्ये 50 सदस्य पक्षाला मिळावे, अशी आग्रही मागणी देखील आठवले यांनी केली.

पुणे येथील आंबेडकर भवनच्या पाठीमागची जागा स्मारकासाठी देण्याच्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आश्वासनाची त्वरित पूर्तता करण्यात यावी, कोरेगाव भीमा येथील विजय स्तंभाजवळ विजय स्मारकासाठी सरकारकडून 200 एकर जागा उपलब्ध व्हावी, अशा मागण्याही आठवले यांनी केल्या. विजय स्तंभाच्या जागेची पाहणी राज्याचा समाज कल्याण विभाग आणि जिल्हाधिकारी कार्यालय यांच्याकडून झाली असून शेतकऱ्यांना योग्य मोबदला देऊन स्मारकासाठी जागा अधिग्रहित करावी, असे आठवले यांनी सांगितले. धम्मचक्र दिनी 14 ऑक्टोबर रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे काही काळ वास्तव्य असलेल्या सातारा येथून सामाजिक समरसता मार्च काढण्यात येणार असून तो महाराष्ट्रभर जाईल आणि त्याचा समारोप पुण्यात करण्यात येईल, असेही आठवले यांनी नमूद केले. सातारा येथे डॉ आंबेडकर यांच्या मातोश्रींचे स्मारक उभारले जावे, अशी मागणीही त्यांनी केली. चवदार तळ्याच्या शताब्दी वर्षानिमित्त पक्षाच्यावतीने राज्यभरात वर्षभर विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे, असेही आठवले यांनी सांगितले.

### जबाबदारीने वक्तव्य करावीत

गोविंद पानसरे लिखित 'शिवाजी कोण होता,' या पुस्तकाच्या शीर्षकात छत्रपती शिवाजी महाराजांचा एकेरी उल्लेख असल्याने संतापलेल्या आमदार संजय गायकवाड यांनी संपादकांना शिवीगाळ करून धमकीही दिली. त्याबद्दल प्रतिक्रिया व्यक्त करताना आठवले म्हणाले की, पुस्तकाची नवी आवृत्ती प्रकाशित करताना प्रकाशकांनी 'छत्रपती शिवाजी महाराज कोण होते?' असा बदल करण्यास हरकत नव्हती. मात्र, संजय गायकवाड हे लोकप्रतिनिधी आहेत. सर्वच लोकप्रतिनिधींनी वक्तव्य करताना जबाबदारीचे भान ठेवणे आवश्यक आहे, असे मत आठवले यांनी व्यक्त केले.



### धार्मिक गुरूंनी वादग्रस्त विधानाऐवजी प्रबोधन करावे


बाबा बागेश्वर यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या बद्दल केलेल्या वादग्रस्त विधानामुळे राज्यात संतापाची लाट पसरली आहे. यावर देखील आठवले यांनी प्रतिक्रिया व्यक्त केली. धार्मिक गुरूंनी वादग्रस्त विधाने करण्यापेक्षा समाजाचे प्रबोधन करावे. लोकांच्या जीवनामध्ये विधायक बदल कसे होतील, या दृष्टीने प्रयत्न करावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. भोंदू अशोक खरात याचा भांडाफोड झाल्यानंतर अनेक भोंदू बाबांचे पितळ उघडे पडत आहे. या पार्श्वभूमीवर देशातल्या सर्वच बुवा बाबांची सखोल चौकशी करण्यात यावी, अशी मागणीही आठवले यांनी केली.

## थोडक्यात पण महत्वाचे




### सोशल तर्फे व्हॉइसेस फ्रॉम द हुड रिपोर्ट

पुणे (आरंभ पर्व) : सोशल ने व्हॉइसेस फ्रॉम द हुड हा अशा प्रकारचा पहिलाच रिपोर्ट प्रकाशित केला आहे. तरुण भारतीयांना आकार देणारी जीवनशैली,वृत्ती आणि आकांक्षा याचा यामध्ये समावेश आहे. भारतातील १०,००० हून अधिक प्रतिसादकर्त्यांकडून संकलित केलेल्या माहितीच्या आधारावर हा अहवाल, वेगाने बदलणाऱ्या सांस्कृतिक परिदृश्यात तरुण भारतीय सामाजिक जीवन, डिजिटल संस्कृती,मनोरंजन ,प्रवास,नाते संबंध ,करिअर विषयक आकांक्षा याचा मेळ कसे घालत आहेत याचे आकडेवारीवर आधारित सखोल दर्शन घडवते.


डॉ. नरेंद्र दाभोलकर | गोविंद पानसरे | एम. एम. कलबुर्गी | गौरी लंकेश | रोहित वेमुला

### महाराष्ट्रदिनी प्रदेश युवक काँग्रेसतर्फे पुण्यात 'लोकशाही संवाद'

- डॉ. नरेंद्र दाभोलकर, गोविंद पानसरे, एम. एम. कलबुर्गी, गौरी लंकेश व रोहित वेमुला विचार अभियानाचे उद्घाटन

पुणे (आरंभ पर्व) : महाराष्ट्र दिनाच्या औचित्याने समाजातील बदलत्या वैचारिक, सामाजिक आणि शैक्षणिक आव्हानांना उत्तर देण्यासाठी महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसतर्फे 'लोकशाही संवाद' या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. डॉ. नरेंद्र दाभोलकर, गोविंद पानसरे, एम. एम. कलबुर्गी, गौरी लंकेश व रोहित वेमुला यांच्या नावाने पाच विचार अभियानाचे उद्घाटन यावेळी करण्यात येणार आहे. युवकांना समाजपरिवर्तनाच्या केंद्रस्थानी ठेवत विचार, संवाद आणि कृती यांची नवी दिशा देण्याचा प्रयत्न या माध्यमातून केला जाणार आहे. येत्या शुक्रवारी (ता. १ मे) सायंकाळी ५ वाजता पंडित जवाहरलाल नेहरू सांस्कृतिक भवन, घोले रोड, शिवाजीनगर, पुणे येथे हा कार्यक्रम होणार आहे. भारतीय युवक काँग्रेसचे राष्ट्रीय प्रभारी मनीष शर्मा, ज्येष्ठ विचारवंत विश्वंभर चौधरी, विधिज्ञ ॲड. असीम सरोदे, सामाजिक कार्यकर्त्या स्मिता पानसरे व हमीद दाभोलकर यांची या सोहळ्याला प्रमुख उपस्थिती लाभणार असून, विविध समकालीन विषयांवर त्यांचे मार्गदर्शन युवकांना प्रेरणादायी ठरणार आहे, अशी माहिती युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष शिवराज मोरे यांनी दिली.

### सुदृढ स्नायू, सुडौल शरीरासाठी 'वंडर एक्सॉन' तंत्रज्ञान प्रभावी




- डॉ. पल्लवी अहिरे-शेळके यांची माहिती; बाणेरमधील 'स्किनएथिक्स'ने आणले भारतातील पहिले प्रगत तंत्रज्ञान

पुणे (आरंभ पर्व) : बदलती जीवनशैली, जिमसाठी मर्यादित वेळ आणि झटपट परिणामांची वाढती अपेक्षा यामुळे फिटनेस क्षेत्रात 'मसल टोनिंग' हा नवा सायन्स-बेस्ड ट्रेंड ठरत आहे. फक्त वजन कमी करणे म्हणजे शरीर सुदृढ होणे नव्हे; शरीर खरोखर सुदृढ होण्यासाठी आणि योग्य पद्धतीने वजन कमी करण्यासाठी संपूर्ण शरीरातील स्नायू वाढणे अत्यंत महत्त्वाचे आहे. कोणत्याही शास्त्रक्रियेविना वजन कमी करण्यासह सुदृढ स्नायू आणि सुडौल शरीरासाठी 'वंडर एक्सॉन' तंत्रज्ञान प्रभावी ठरत आहे. या जागतिक तंत्रज्ञानाचे भारतामधील पहिले 'वंडर एक्सॉन' प्रगत तंत्रज्ञानाधारित उपचारपद्धती बाणेर येथील स्किनएथिक्स हॉस्पिटलमध्ये उपलब्ध झाली आहे, अशी माहिती प्रसिद्ध त्वचारोगतज्ज्ञ व स्किनएथिक्स हॉस्पिटलच्या संस्थापिका डॉ. पल्लवी अहिरे-शेळके यांनी पत्रकार परिषदेत दिली. प्रसंगी स्किनएथिक्स येथील डॉ. कांचन मुळे, डॉ. प्राजक्ता शर्मा, डॉ. प्रियांका बोबडे, बाणेर-बालेवाडी मेडिकल असोसिएशनचे संस्थापक डॉ. राजेश देशपांडे उपस्थित होते.

## विवो इग्नाइटची आवृत्ती जाहीर; तंत्रज्ञानाद्वारे सशक्त करण्यावर भर

**नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)**

Vivo India ने आपल्या प्रमुख शैक्षणिक उपक्रम 'विवो इग्नाइट : अ टेक्नॉलॉजी अँड इनोव्हेशन इनिशिएटिव्ह'च्या चौथ्या आवृत्तीची घोषणा केली असून, यंदा महत्त्वाकांक्षी जिल्ह्यांमधील विद्यार्थ्यांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात येणार आहे. या उपक्रमाद्वारे इयत्ता ८ वी ते १२ वीतील विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाच्या माध्यमातून नवोपक्रम विकसित करण्याची आणि देशासमोरील महत्त्वाच्या आव्हानांवर उपाय शोधण्याची संधी उपलब्ध होणार आहे. या स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांची नोंदणी सुरू झाली असून, इच्छुक विद्यार्थ्यांनी ३० जूनपर्यंत http://www.vivoignite.com या संकेतस्थळावर अर्ज करू शकतात. विद्यार्थी वैयक्तिकरित्या किंवा तीन सदस्यांच्या गटात 'प्रोटोटाइप' श्रेणीत सहभागी होऊ शकतात. सामाजिक विकास, सॉफ्ट-टेक, कृषी, हवामान बदल आणि शाश्वत विकास उद्दिष्टांशी संबंधित विविध विषयांवर आधारित कल्पनांना प्राधान्य दिले जाणार आहे. स्पर्धा एकूण सात टप्प्यांत पार पडणार असून, अंतिम फेरी ११ ऑक्टोबर रोजी नवी दिल्ली येथे होणार आहे. अंतिम टप्प्यातील अव्वल १० स्पर्धकांना त्यांच्या कल्पना सादर करण्याची संधी मिळेल. विजेत्यांना एकूण ₹४० लाखांपर्यंत शैक्षणिक शिष्यवृत्ती आणि पारितोषिके दिली जाणार आहेत. यंदाच्या आवृत्तीमध्ये 'अचीव्हर ३०' हा नवा टप्पा समाविष्ट करण्यात आला आहे.

## संकट मोचन हनुमान – धैर्य आणि भक्तीची दिव्य गाथा

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

सोनी पल, भारतातील लोकप्रिय फ्री-टू-एअर मनोरंजन वाहिनी, विविध प्रकारच्या दर्जेदार कार्यक्रमांसाठी ओळखली जाते. ही वाहिनी अभिमानाने संकट मोचन हनुमान या पौराणिक मालिकेच्या प्रीमियरची घोषणा करत आहे. अनेक पिढ्यांना प्रेरणा देणारी ही कालातीत मालिका आता सोनी पल वर नव्या रूपात सादर होत असून, प्रेक्षकांना भगवान हनुमानांच्या पराक्रमाची भव्य गाथा पुन्हा अनुभवण्याची संधी मिळणार आहे. या महाकथेच्या केंद्रस्थानी आहेत भगवान हनुमान भक्ती, शक्ती आणि धैर्य यांचे प्रतीक असलेले 'सुपरहिरो'. त्यांचा प्रवास शौर्य आणि अखंड निष्ठेने भरलेला आहे, जो सर्व वयोगटातील प्रेक्षकांच्या मनाला भिडतो आणि श्रद्धा, धर्मनिष्ठा




व निःस्वार्थ सेवेसारख्या शाश्वत मूल्यांची आठवण करून देतो. भगवान हनुमानांचा हा प्रवास एक निर्भय रक्षक म्हणून उलगडतो, ज्यांची भगवान रामांप्रती निष्ठा अटळ आहे आणि वाईटावर विजय मिळवण्याचे त्यांचे धैर्य अतुलनीय आहे. भव्य दृश्यरचना आणि प्रभावी कथनशैलीमुळे ही मालिका केवळ मनोरंजन नाही, तर एक प्रेरणादायी आणि आत्म्याला स्पर्श करणारा अनुभव आहे.

या मालिकेतील कलाकारांनी आपल्या भूमिकांना अत्यंत प्रभावीपणे साकारले आहे. गगन मलिक यांनी भगवान रामांच्या शांतता आणि तेजस्वी व्यक्तिमत्त्वाला न्याय दिला आहे, देबलिना चॅटर्जी यांनी सीता मातांची करुणा आणि सामर्थ्य साकारले आहे, निर्भय वाधवा यांनी भगवान हनुमानांची दिव्य ऊर्जा प्रभावीपणे मांडली आहे, तर सौरव गुर्जर यांनी रावणाच्या भूमिकेत प्रभावी कामगिरी केली आहे. या सर्वांनी मिळून एक जादुई आणि परंपरेशी नातं जपणारा विश्व उभा केला आहे.

भगवान हनुमानांना सर्वोच्च रक्षक आणि दिव्य सुपरहिरो म्हणून साजरे करण्याच्या मुख्य संकल्पनेवर आधारित संकट मोचन हनुमान ही मालिका आपल्या कालातीत संदेशाने आणि अविस्मरणीय अभिनयाने प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करणार आहे. सोनी पल प्रेक्षकांना या दिव्य प्रवासात सहभागी होण्याचे आमंत्रण देत आहे कारण भगवान हनुमानांची गाथा पुन्हा एकदा टीव्हीवर परत येत आहे, अधिक प्रभावी, प्रेरणादायी आणि आजच्या काळातही तितकीच महत्त्वाची!

## लोकसंख्या पुढील पाच वर्षांत ५१% ने वाढणार : नाइट फ्रँक

Knight Frank

नाइट फ्रँकच्या वेल्थ साइजिंग मॉडेलनुसार, भारतातील अब्जाधीशांची संख्या २०२६ च्या सुरुवातीला २०७ वरून २०३१ पर्यंत ५१% ने वाढून ३१३ होण्याचा अंदाज आहे. जागतिक अब्जाधीशांमध्ये भारताचा सध्याचा ६.७% वाटा पुढील पाच वर्षांत वाढून ८% होईल.अशी माहिती शिशिर बैजल, इंटरनॅशनल पार्टनर, चेअरमन आणि मॅनेजिंग डायरेक्टर, नाइट फ्रँक इंडिया यांनी दिली.

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

आघाडीची स्वतंत्र जागतिक प्रॉपर्टी कन्सल्टन्सी कंपनी नाइट फ्रँक यांनी त्यांच्या प्रतिष्ठित द वेल्थ रिपोर्ट च्या २०व्या आवृत्तीचे प्रकाशन केले. या अहवालात भौगोलिक-राजकीय अनिश्चितता, वाढत्या व्याजदरांबाबतची चिंता आणि असमान आर्थिक कामगिरी असूनही जागतिक संपत्ती निर्मितीत झालेली मोठी गतीवाढ स्पष्ट करण्यात आली आहे. २०२१ ते २०२६ या कालावधीत जगातील अल्ट्रा-हाय-नेट-वर्थ व्यक्तींची (UHNWI, USD 30m+) संख्या १,६२,१९१ ने वाढली - म्हणजे दररोज सरासरी ८९ नवीन UHNWIs - आणि त्यामुळे जागतिक एकूण संख्या ७,१३,६२६ वर पोहोचली आहे..

भारताची अल्ट्रा-हाय-नेट-वर्थ (UHNW) व्यक्तींची कहाणी ही जलद विस्तारानंतर मोठ्या प्रमाणावर झालेल्या एकत्रीकरणाची आहे. २०२१ ते २०२६ या कालावधीत USD 30 mn+ लोकसंख्या ६३% ने वाढली असून, ती सुमारे १२,००० पेक्षा थोडी अधिक असलेल्या संख्येतून १९,८७७ पर्यंत पोहोचली आहे. ही वाढ तंत्रज्ञान, औद्योगिक क्षेत्रे आणि भांडवली बाजारांमधील अभूतपूर्व संपत्ती निर्मितीचे प्रतिबिंब आहे. देश आता जगातील सहाव्या क्रमांकाची सर्वात मोठी UHNWI लोकसंख्या असलेला देश आहे. नाइट फ्रँकच्या वेल्थ साइजिंग मॉडेलनुसार, भारतातील UHNWI लोकसंख्या २०२६ च्या सुरुवातीच्या १९,८७७ वरून २०३१ पर्यंत २७% ने वाढून २५,२१७ होईल. मुंबई भारतातील UHNW म्हणजेच अल्ट्रा-श्रीमंत लोकसंख्येच्या ३५.४% वाट्यासह प्रमुख स्थानावर कायम आहे. नाइट फ्रँकने नमूद केले की आर्थिक दृष्ट्या भारतातील विविध प्रदेश जलद गतीने विकसित होत असल्याने संपत्ती अधिक विखुरली गेली आहे आणि त्यामुळे काही शहरांनी अल्ट्रा-श्रीमंत लोकसंख्येतील आपला वाटा वाढवला आहे.

दिल्ली आणि चेन्नई यांनी मागील १० वर्षांत अल्ट्रा-श्रीमंत लोकसंख्येतील आपला वाटा ३% ने वाढवला आहे. हैदराबादनेही २०१५ पासून आपला वाटा १.३% ने वाढवला आहे. भारतातील अब्जाधीश लोकसंख्या पुढील पाच वर्षांत ५१% ने वाढणार. भारतातील अब्जाधीशांची संख्या मागील पाच वर्षांत ५८% ने वाढून २०२६ मध्ये २०७ वर पोहोचली आहे.

## अतुलनीय कौशल्य आणि अधिक व्यापक पोहोच

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारतातील अग्रगण्य कीटक नियंत्रण आणि स्वच्छता सेवा प्रदाता Rentokil PCI ने Pecop Pest Control Services Pvt Ltd (पेकॉप) च्या यशस्वी अधिग्रहणाची घोषणा केली आहे. या अधिग्रहणामुळे रेंटोकिल पीसीआयची, विशेषतः पश्चिम विभागातील ग्राहकांना सेवा देण्याची क्षमता अधिक मजबूत होणार असून, कीटक व्यवस्थापन उद्योगात नवीन मानके स्थापित करण्याच्या तिच्या वचनबद्धतेलाही बळकटी मिळणार आहे. या व्यवहाराअंतर्गत पेकॉपचा ग्राहक पोर्टफोलिओ, अनुभवी कर्मचारी वर्ग आणि कार्यात्मक मालमत्ता आता रेंटोकिल पीसीआयच्या विस्तृत नेटवर्कमध्ये समाविष्ट करण्यात येणार आहेत. नवोपक्रम, उत्कृष्ट सेवा आणि शाश्वत वाढ या समान मूल्यांवर आधारित या दोन संस्थांचे एकत्रीकरण भविष्यातील प्रगतीसाठी महत्त्वपूर्ण मानले जात आहे. मुंबईमध्ये स्थापन झालेल्या पेकॉपने गेल्या अनेक दशकांत व्यावसायिक सेवा, लक्झरी हॉस्पिटॅलिटी आणि प्रीमियम एंटरटेनमेंट क्षेत्रात आपली मजबूत ओळख निर्माण केली आहे.

## रस्त्यांची प्रलंबित कामे तात्काळ पूर्ण करा : मारुती वायाळ

**जुन्नर (दै. आरंभ पर्व)**

जुन्नर तालुक्याच्या आदिवासी भागातील रस्त्यांची दुरवस्था झाली असून प्रलंबित कामे तात्काळ पूर्ण करावीत अशी मागणी नॅशनल आदिवासी पिपल्स फेडरेशन महाराष्ट्र राज्य अध्यक्ष मारुती वायाळ यांनी केली आहे. या बाबतचे निवेदन त्यांनी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (पुणे उत्तर)यांना दिले आहे. वायाळ यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात, १) जुन्नर ते आपटाळे,२) आपटाळे ते कुकडेश्वर ३) कुकडेश्वर ते घाटघर (नाणेघाट मार्ग) ह्या प्रमुख रस्त्यांची अत्यंत दयनीय अवस्था झालेली आहे. स्थानिक नागरिक, विद्यार्थी, रुग्ण व शेतकरी वर्गाला यामुळे मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे, या प्रश्नाबाबत आपल्या विभागाच्या स्थानिक अधिकाऱ्यांची अनेकदा प्रत्यक्ष भेट देऊन त्यांना रस्त्याच्या कामाबाबत विनंती करण्यात आलेली आहे. मात्र यावर आजपर्यंत कोणतीही ठोस कार्यवाही झालेली दिसून येत नाही यामुळे आदिवासी समाजात नाराजीची भावना असून याबाबत खेद व्यक्त करण्यात येत आहे. संबंधित सर्व प्रमुख रस्ते आदिवासी भागातील असूनही त्याकडे आवश्यक ते लक्ष दिले जात नसल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. ह्या रस्त्यांच्या दुरुस्ती/ बांधकामासाठी निविदा (टेंडर) प्रक्रिया पूर्ण झाल्याची माहिती मिळत आहे. तरीदेखील प्रत्यक्षात कामे सुरू होत नसल्याने प्रशासनाची कार्यपद्धती व संबंधित ठेकेदारांची जबाबदारी याबाबत गंभीर प्रश्न निर्माण होत आहेत. ठेकेदारांनी केलेल्या करारातील अटी व शर्तीप्रमाणे तात्काळ काम सुरू करून निश्चित कालावधीत पूर्ण करणे आवश्यक आहे. वरील सर्व रस्त्यांच्या कामांची तात्काळ पाहणी करून कामे सुरू करण्याचे आदेश द्यावेत. संबंधित ठेकेदारांना कडक सूचना देऊन विलंबाबाबत जबाबदारी निश्चित करावी.कामात होत असलेल्या निष्काळजीपणाबाबत दोषींवर प्रशासकीय कारवाई करावी. अन्यथा सदर प्रकरणाबाबत उच्चस्तरीय कार्यालयांकडे तक्रार सादर करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

## विद्यार्थ्यांसाठी ड्रोन इनोव्हेशन उपक्रम

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

'सह्याद्री स्टार्टअप्स'च्या वतीने विद्यार्थ्यांसाठी 'ड्रोन इनोव्हेशन' उपक्रम आयोजित करण्यात आला. या उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांना ड्रोन तंत्रज्ञान, स्टार्टअप संस्कृती आणि प्रत्यक्ष उद्योगजगताचा अनुभव देण्यात आला. हा कार्यक्रम सेरेब्रोस्पार्क इनोव्हेशन्स (Cerebrospark Innovations Pvt. Ltd.) या ड्रोन क्षेत्रातील स्टार्टअपच्या सहकार्याने पार पडला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना वर्गातील शिक्षणाबरोबरच प्रत्यक्ष उद्योगातील कामकाजाची ओळख करून देण्यात आली. कार्यक्रमादरम्यान कंपनीच्या संस्थापक गणेश थोरात, मिहीर केदार आणि त्यांच्या सर्व सहकाऱ्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत आपल्या उद्योजकीय प्रवासाबाबत माहिती दिली. स्टार्टअप उभारणीतील आव्हाने, संधी आणि ड्रोन क्षेत्रातील वाढत्या संधींबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. यानंतर आयोजित कार्यशाळेत विद्यार्थ्यांना ड्रोनची रचना, त्यातील महत्त्वाचे घटक तसेच विविध क्षेत्रांतील उपयोग याची




माहिती देण्यात आली. संवादात्मक सत्रामुळे विद्यार्थ्यांना तज्ज्ञांशी थेट चर्चा करण्याची संधी मिळाली. या उपक्रमामध्ये संशोधन व विकास प्रयोगशाळेचा (R&D Lab) अनुभवही विद्यार्थ्यांना देण्यात आला. येथे ड्रोनचा वापर सुरक्षा, सर्वेक्षण आणि संशोधनासाठी कसा केला जातो याची माहिती विद्यार्थ्यांना मिळाली.

कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे ड्रोन उड्डाणाचा प्रत्यक्ष अनुभव. तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली प्रत्येक विद्यार्थ्याला ड्रोन उडविण्याची संधी देण्यात आली. यामुळे विद्यार्थ्यांना नियंत्रण, स्थिरता आणि सुरक्षेचे मूलभूत तत्त्व समजण्यास मदत झाली.

या उपक्रमाबाबत सह्याद्री स्टार्टअप्सचे संस्थापक सलील उरुणकर यांनी सांगितले की, "विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकापुरते शिक्षण न देता त्यांना प्रत्यक्ष अनुभव देणे आवश्यक आहे. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये नवोपक्रम आणि उद्योजकतेची प्रेरणा निर्माण होते." विद्यार्थ्यांनी या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला असून हा अनुभव प्रेरणादायी ठरल्याचे त्यांनी सांगितले. भविष्यातही अशा अनुभवाधारित उपक्रमांचे आयोजन करण्याचा मानस सह्याद्री स्टार्टअप्सने व्यक्त केला आहे.






दैनिक **आरंभपर्व**

आरंभ एका नव्या पर्वाचा

Epaper : www.aparv.com

गुरुवार, दि. ३० एप्रिल २०२६









# ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासासाठी संघटित पद्धतीने काम करण्याची गरज - खासदार मेधा कुलकर्णी

**किरण खुडे**



**राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)**

ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासासाठी एकजुटीने आणि संघटित पद्धतीने काम करण्याची गरज असून शेती क्षेत्रातही गट पद्धतीने काम करण्याचे आवाहन राज्यसभेच्या खासदार डॉ. मेधा कुलकर्णी यांनी दावडी ( ता.खेड ) येथे केले.

दावडी ( ता.खेड ) येथे रामसुकृत कल्याण फाऊंडेशनच्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन राज्यसभेच्या खासदार डॉ. मेधा कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर खेडचे आमदार बाबाजी काळे, पंचायत समितीच्या सभापती विद्या मोहिते, जिल्हा परिषद सदस्य विजयसिंह शिंदे पाटील, सदस्या दीप्ती भोगाडे, पंचायत समिती सदस्य प्रसाद घेणंद, फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष संभाजी घारे, नगरसेवक निलेश गोरे, संचालक दीपक घारे, संचालक संजय घारे, मंगेश सावंत, बाळासाहेब शिंदे, निमगावचे सरपंच अमर शिंदे पाटील, खेड तालुका खरेदी विक्री संघाचे संचालक संतोष गोरडे, फाल्गुनी जपे, सुभाष कळंबकर, सुरेश भुजबळ, डॉ. लक्ष्मीकांत शामसुंदर, संदीप गाडे यांच्यासह गावातील आजी-माजी सरपंच, उपसरपंच, विविध संस्थांचे पदाधिकारी आणि ग्रामस्थ उपस्थित होते. फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष संभाजी घारे यांनी प्रास्ताविकात कार्याची माहिती देताना फाऊंडेशन सध्या शिक्षण, कौशल्यविकास, वैद्यकीय शिबिरे आणि शासकीय योजनांसाठी मदत या चार प्रमुख विभागांत काम करत असल्याचे सांगितले. ग्रामीण समाजाला सक्षम, स्वावलंबी आणि संघटित बनविणे हेच फाऊंडेशनचे प्रमुख उद्दिष्ट असल्याचे त्यांनी भाषणात नमूद केले.

रामसुकृत कल्याण फाऊंडेशन तेजोमय आय केअर फाऊंडेशन, श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सत्य साई सेवा ट्रस्ट, रेलफोर फाऊंडेशन आणि इतर संस्थांच्या सहकार्याने विविध लोकाभिमुख उपक्रम राबवत असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

रामसुकृत कल्याण फाऊंडेशन ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक मार्गदर्शन व मदत उपलब्ध करून देणे, युवक-युवतींना कौशल्यविकासाच्या माध्यमातून रोजगारक्षम बनवणे, गरजूंसाठी आरोग्य शिबिरे आयोजित करणे, तसेच गंभीर आजारांसाठी आणि इतर गरजांसाठी कुटुंबांना शासकीय योजना व आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी सहाय्य करणे अशा महत्त्वपूर्ण क्षेत्रांत कार्य करत असल्याबद्दल उपस्थित मान्यवरांनी संस्थेचे कौतुक केले.






## ‘एसीलोर स्टेलेस्ट’ लेन्सला मोठी मान्यता

**नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)**

EssilorLuxottica ने विकसित केलेल्या ‘एसीलोर स्टेलेस्ट’ या चष्मा लेन्सला US Food and Drug Administration कडून ‘डी नोव्हो’ मार्गाद्वारे बाजारपेठेत विक्रीसाठी अधिकृत मान्यता मिळाली आहे. यापूर्वी 2021 मध्ये या उत्पादनाला ‘ब्रेकथ्रू टेक्नॉलॉजी’चा दर्जाही देण्यात आला होता. विशेष म्हणजे, मुलांमधील मायोपिया (नजीकचा दृष्टीदोष) नियंत्रित करण्यासाठी FDA मान्यता मिळालेली ही पहिली आणि एकमेव चष्मा लेन्स आहे. क्लिनिकल अभ्यासांनुसार, या लेन्समुळे दोन वर्षांच्या कालावधीत मुलांमधील मायोपियाचा वाढीचा वेग सरासरी 71% पर्यंत कमी झाल्याचे दिसून आले आहे, जे नेत्रआरोग्य क्षेत्रातील एक महत्त्वपूर्ण प्रगती मानली जाते. भारतात मायोपियाचे प्रमाण झपाट्याने वाढत असून, 2050 पर्यंत शहरी भागातील जवळपास 50% मुले या समस्येला सामोरे जाऊ शकतात, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. यावर उपाय म्हणून EssilorLuxottica भारतात FDA-मान्यताप्राप्त नवकल्पना आणून मायोपिया व्यवस्थापनात सुधारणा करण्यावर भर देत आहे. तसेच National Accreditation Board for Hospitals & Healthcare Providers च्या मानकांनुसार उपचार पद्धती विकसित करण्याचे उद्दिष्ट आहे. भारतात डोळ्यांची तपासणी अनिवार्य नसल्यामुळे अनेक मुलांमधील दृष्टीदोष वेळेवर ओळखला जात नाही. पालकांनी विशेषतः शाळा सुरू होण्यापूर्वी (Back to School) डोळ्यांची तपासणी करून घेणे गरजेचे आहे.

## इंडिया कृत्रिम बुद्धिमत्ता केंद्रासाठी गुगलची पायाभरणी

**विशाखापटनम (दै. आरंभ पर्व)**




Google या जागतिक तंत्रज्ञान संस्थेने आंध्र प्रदेशातील विशाखापटनम येथे भारतातील सर्वात मोठ्या गुंतवणुकींपैकी एक ठरणाऱ्या “इंडिया कृत्रिम बुद्धिमत्ता केंद्रा”ची पायाभरणी केली. विकसित भारताच्या दिशेने हे एक महत्त्वाचे पाऊल मानले जात असून, या उपक्रमासाठी Bharti Airtel आणि Adani Group यांच्या अदानीकनेक्स उपक्रमाची साथ लाभली आहे. या उपक्रमात एअरटेलची माहिती-संचय केंद्र शाखा नेक्स्ट्रा ही अतिविशाल क्षमतेची माहिती-संचय व्यवस्था उभारणार आहे. अतिवेगवान तंतू-जाळे, हरित ऊर्जा आणि आधुनिक समुद्राखालील केबल जोडणी केंद्रांच्या साहाय्याने देशाच्या अंकाधारित पायाभूत सुविधांमध्ये हा उपक्रम महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे. या समारंभाला केंद्रीय मंत्री Ashwini Vaishnaw (अश्विनी वैष्णव), आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री N. Chandrababu Naidu (नारा चंद्राबाबू नायडू), मंत्री Nara Lokesh (नारा लोकेश) तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. यावेळी बोलताना भारती एअरटेलचे उपाध्यक्ष गोपाल विठ्ठल यांनी सांगितले की, “गुगल आणि अदानी यांच्यासोबतची ही भागीदारी भारताच्या अंकाधारित प्रगतीला वेग देईल. विशाखापटनम जागतिक कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातील एक महत्त्वाचे केंद्र म्हणून उदयास येईल.”

### एअरटेल व अदानीकनेक्सची साथ

केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितले की, हा उपक्रम पंतप्रधान Narendra Modi (नरेंद्र मोदी) यांच्या भारताला तंत्रज्ञान क्षेत्रात अग्रस्थानी नेण्याच्या दृष्टीकोनाचे प्रतीक आहे.

मुख्यमंत्री नारा चंद्राबाबू नायडू यांनी नमूद केले की, “हे केंद्र राज्यातील तंत्रज्ञान विकासाला चालना देईल आणि युवकांसाठी उच्च मूल्याच्या रोजगार संधी निर्माण करेल.” गुगल क्लाउडचे प्रमुख Thomas Kurian (थॉमस कुरियन) यांनी हा उपक्रम भारताच्या कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित भविष्यासाठी महत्त्वाचा टप्पा असल्याचे सांगितले. अदानी समूहाचे संचालक Jeet Adani (जीत अदानी) यांनीही या उपक्रमामुळे भारताच्या अंकाधारित विकासाला नवे बळ मिळेल असे स्पष्ट केले. २०२६ ते २०३० या कालावधीत १५ अब्ज अमेरिकी चलनाची गुंतवणूक या उपक्रमासाठी करण्यात येणार असून, तीन मोठी माहिती-संचय केंद्रे उभारली जाणार आहेत. यामुळे देशभरात कमी विलंबाच्या कृत्रिम बुद्धिमत्ता सेवा उपलब्ध होतील. या उपक्रमांतर्गत पाणी व्यवस्थापन, मासेमारांसाठी प्रशिक्षण, महिला उद्योजकता, अंकाधारित साक्षरता आणि कृत्रिम बुद्धिमत्ता प्रशिक्षण यांसारखे विविध उपक्रम राबवले जाणार आहेत. १०,००० हून अधिक महिलांना सक्षम करण्याबरोबरच हजारो युवकांना कौशल्य प्रशिक्षण दिले जाणार आहे.

## पाळीव कुत्र्यांच्या खाद्यपदार्थ क्षेत्रातील अग्रगण्य ‘पेडिग्री’चा नवा प्रचार

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

PEDIGREE या पाळीव कुत्र्यांच्या खाद्यपदार्थ क्षेत्रातील अग्रगण्य ब्रँडने आपल्या रसाळ खाद्यपदार्थ मालिकेचा प्रसार करण्यासाठी भारतीय क्रिकेटपटू जेमिमा रोड्रिग्स हिला आपल्या नव्या प्रचार मोहिमेचा प्रमुख चेहरा म्हणून निवडले आहे. ही मोहीम रसाळ कुत्रा-आहाराला संपूर्ण आणि दैनंदिन आहाराचा भाग म्हणून अधोरेखित करते. तसेच भारतातील वाढत्या पाळीव प्राणी संगोपकांना आपल्या प्राण्यांसाठी हा आहार प्रथम पसंती म्हणून निवडण्यास प्रोत्साहित करते. (मार्स) या कंपनीने पेडिग्री ब्रँडसाठी नव्या प्रकारची प्रचार मोहीम सुरू केल्याची घोषणा केली आहे. ही मोहीम जेमिमा रोड्रिग्स हिच्या सहकार्याने साकारण्यात आली असून, आधुनिक पाळीव प्राणी संगोपनातील बदलत्या दृष्टिकोनावर आधारित आहे. यात अधिक माहितीपूर्ण आणि पोषणाधारित आहार पद्धतीकडे वळण्यावर भर देण्यात आला आहे, तसेच चवीत कोणतीही तडजोड न करण्याचा संदेश दिला आहे. या आहारामध्ये भरपूर प्रथिने असून, तो पूर्ण आणि संतुलित पोषण देणारा पर्याय मानला जातो. योग्य प्रमाणात दिल्यास तो पाळीव प्राण्यांसाठी स्वादिष्ट आणि पौष्टिक ठरतो. जेमिमा रोड्रिग्स ही एक समर्पित पाळीव प्राणी संगोपक तसेच देशातील एक प्रमुख युवा क्रीडापटू म्हणून ओळखली जाते. तिची शिस्त, ऊर्जा आणि कार्यक्षमतेवर आधारित दृष्टिकोन या मोहिमेला बळ देतो. ती केवळ क्रिकेटपटू म्हणून नव्हे, तर पाळीव प्राण्यांची काळजी घेणारी व्यक्ती म्हणूनही या मोहिमेत सहभागी झाली आहे.




## थोडक्यात पण महत्वाचे



### पंचायत समितीमध्ये सावळा गोंधळ, गट विकास अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष

दौंड (आरंभ पर्व) : दौंड पंचायत समिती मधील एम आर जी एस (मनरेगा) विभागामध्ये प्रामुख्याने विहीर, गाय गोठा, वृक्ष लागवड आदी प्रकारचे प्रस्ताव शेतकऱ्यामार्फत स्वीकारली जातात, या विभागाकडून अनेक प्रकरणे मंजूर असून मस्टर सुद्धा निघालेले आहेत परंतु त्यांची बिले सोडली जात नाहीत, दौंड तालुक्यातून अनेक शेतकरी आपली बिले सोडली जावेत यासाठी या विभागात येत असतात, परंतु कोणत्या विभागामध्ये अधिकारी उपस्थित नसतात, तर काही चिरीमिरी साठी शेतकऱ्यांची आडवणूक करत आले आहेत, सध्या दौंड पंचायत समितीवर आमदार राहुल दादा कुल यांचे वर्चस्व असून पारदर्शक कारभार होईल अशी अपेक्षा आहे, अशा प्रकारे शेतकऱ्यांच्या होणाऱ्या पिळवणुकीबाबत दौंड पंचायत समितीचे गट विकास अधिकारी अरुण मरभळ यांना संपर्क केला असता त्यांनी सवयीप्रमाणे फोन उचलला नाही, अशाप्रकारे निष्क्रिय गटविकास अधिकारी अनेक भष्ट्राधिकाऱ्यांना पाठीशी घालत असून प्रमाणिक काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना जाणून-बुजून त्रास देण्याचे काम करत आहेत, गट विकास अधिकारी अरुण मरभळ यांचे पंचायत समितीतील अधिकाऱ्यावर कोणत्याही प्रकारचे होल्ड नसून अधिकारी वर्ग कधी गायब असतो, कोण कोणते विभागात काम करते कोण शिपाई कोण क्लार्क याचेही त्यांना माहिती नसावी असे वाटते, अनेक शिपाई क्लार्क झाल्याच्या थाटामध्ये पूर्ण पंचायत समितीसह दौंड शहरातफिरत असतात अशा निष्क्रिय गट विकास अधिकाऱ्यांना याबाबत समज देतील का, व शेतकऱ्यांना न्याय देण्याचं काम करतील का याकडे दौंड शहरा सह तालुक्याचे लक्ष लागले आहे.

### श्रीकृष्ण मंदिराचा वर्धापन दिन व पंचावतार महोत्सव उत्साहात संपन्न



उरुळी कांचन (आरंभ पर्व) : उरुळी कांचन (ता. हवेली) येथील श्रीकृष्ण मंदिराचा ४२ वा वर्धापन दिन तसेच पंचावतार महोत्सव मोठ्या भक्तिभावाने आणि उत्साहात पार पडला. या निमित्ताने पंचावतार उपहार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. भगवद्गीतेतील “यदा यदा हि धर्मस्य...” या संदेशानुसार धर्मसंस्थापनेसाठी भगवान श्रीकृष्ण अवतार घेतात, अशी श्रद्धा व्यक्त करत या सोहळ्यात भक्तांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. मंदिर हे समाजाला मानसिक आधार देणारे केंद्र असून, अशा धार्मिक उत्सवांमुळे भक्तांना शांतता आणि समाधान मिळते, असेही यावेळी सांगण्यात आले. या कार्यक्रमास परमपूज्य सुबोधमुनी धाराशिवकर, महंत गोपालव्यास कपाटे, महंत हरिराज शास्त्री विद्वांस, महंत चक्रपाणी धाराशिवकर, तपस्वी हरुआक्का पंजाबी, यमुनाबाई कपाटे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. तसेच माजी उपसरपंच दत्तात्रय कांचन, हरिभाऊ कांचन, शरद वनारसे, शांताराम चौधरी, अशोक सावंत, संजय आबासाहेब कांचन, दत्तात्रय चौधरी, रवींद्र लोणकर, बापू कांचन, राजू कांचन, राजेंद्र घुले, अभिषेक कांचन, संजय कांचन, संजय टिळेकर, संजय वनारसे, आबा मुरकुटे, संतोष चौधरी, रामभाऊ कांचन, आनंदा चौधरी, रोहित मुरकुटे, संजय चौधरी, संचिता कांचन, बाबासाहेब चौधरी, विजय टिळेकर, विलास तांबे, विठ्ठल कोलते, सुनिल वनारसे, रोशन वनारसे, सुमित वनारसे, विनोद कांचन, चंद्रकांत खेडेकर, तुकाराम जगताप, प्रतिक चौधरी, अतुल सावंत, गोकुळ मुरकुटे, शिवाजी भोसले, भाऊसाहेब कांचन, गुलाब दिघे, आबा झुरुगे आदींसह श्रीकृष्ण सेवा मंडळाचे सर्व सदस्य, पंचक्रोशीतील भाविक व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांच्या सहकार्याने हा सोहळा अत्यंत भक्तिमय वातावरणात आणि उत्साहात यशस्वीरीत्या पार पडला.

# नशिबाचे भोग : कर्म, वर्तन आणि जीवनाचा आरसा

**शाईचा प्रवास | प्रतिक गंगणे**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

मानवी जीवन हे केवळ नशिबावर अवलंबून नसते; ते आपल्या कृतींनी, विचारांनी आणि वर्तनाने घडत असते. “नशिबाचे भोग फिरून येतातच” ही म्हण आपल्याला एक मूलभूत सत्य सांगते. आपण जे पेरतो, तेच उगवते. आयुष्यात घडणाऱ्या प्रत्येक घटनेमागे काही ना काही कारण असते आणि त्या कारणांच्या मुळाशी आपल्या कृतींची बीजे दडलेली असतात.


**कर्माचा नियम-अटळ सत्य :** कर्म हा जीवनाचा अविभाज्य भाग आहे. चांगले किंवा वाईट, प्रत्येक कृतीची नोंद काळाच्या पटलावर होत असते. अनेक वेळा आपण केलेल्या चुकीच्या वागण्याचा परिणाम लगेच दिसत नाही. त्यामुळे आपण ते दुर्लक्षित करतो किंवा त्याचे गांभीर्य कमी समजतो. पण काळ पुढे सरकत राहतो आणि योग्य वेळी त्या कृतींचे फळ आपल्या वाट्याला येते.

हा नियम कोणालाही चुकत नाही. समाजातील मोठी माणसे असोत किंवा सामान्य व्यक्ती. कर्माची परतफेड सर्वांना समानपणे लागू होते.

**अन्यायाची साखळी-आणि तिचा परिणाम :** एखाद्यावर अन्याय करणे हे फक्त त्या व्यक्तीपुरते मर्यादित राहत नाही. त्यातून एक नकारात्मक साखळी निर्माण होते. दुखावलेली व्यक्ती पुढे दुसऱ्याशी तसेच वागू शकते. अशा प्रकारे समाजात कटुता आणि द्वेष वाढत जातो.

याउलट, आपण संयमाने, समजुतीने आणि सहानुभूतीने वागलो, तर सकारात्मक साखळी तयार होते. एक चांगले वर्तन अनेक चांगल्या कृतींना जन्म देते.

**राग आणि अहंकार-सर्वात मोठे शत्रू :** मानवी स्वभावात राग आणि अहंकार हे दोन मोठे दोष आहेत. रागाच्या भरात आपण अनेकदा असे निर्णय घेतो, जे नंतर चुकीचे ठरतात.



एखाद्यावर हात उचलणे, अपमानास्पद शब्द वापरणे किंवा भावनांवर नियंत्रण न ठेवणे-हे सर्व क्षणिक असले तरी त्याचे परिणाम दीर्घकालीन असतात.

खरे सामर्थ्य हे दुसऱ्याला दुखावण्यात नसून स्वतःच्या भावनांवर नियंत्रण ठेवण्यात आहे. जो माणूस आपल्या रागावर विजय मिळवतो, तोच खऱ्या अर्थाने शक्तिशाली असतो.

**मन दुखावणे-अदृश्य जखम :** शारीरिक जखमा दिसतात, पण मनाच्या जखमा अदृश्य असतात. एखाद्या कठोर शब्दामुळे किंवा अपमानामुळे व्यक्ती आतून तुटते. अशा जखमा भरायला खूप वेळ लागतो, आणि कधी कधी त्या कायमस्वरूपी राहतात. म्हणूनच, बोलताना आणि वागताना सजग राहणे अत्यंत गरजेचे आहे. “मी काय बोलतोय?” आणि “याचा दुसऱ्यावर काय परिणाम होईल?” हा विचार प्रत्येकाने करायला हवा.

**चांगल्या कृतींची परतफेड :** जसे वाईट कर्मांचे परिणाम आपल्याला भोगावे लागतात, तसेच चांगल्या कृतींचे फळही आपल्याला मिळते. एखाद्याला मदत करणे, समजून घेणे, सहकार्य करणे-या छोट्या गोष्टी मोठे समाधान देतात.

अनेक वेळा आपण केलेली मदत लगेच परत मिळत नाही, पण ती कुठल्या ना कुठल्या स्वरूपात आपल्या आयुष्यात परत येते. कधी एखाद्या अनोळखी व्यक्तीकडून, कधी एखाद्या संधीच्या रूपाने-पण ती परतफेड नक्की होते.

**सजग जीवनशैली-गरज आणि जबाबदारी :** आजच्या धावपळीच्या जीवनात माणूस अनेकदा स्वतःच्या कृतींकडे दुर्लक्ष करतो. स्पर्धा, ताण आणि अपेक्षा यामुळे तो असंवेदनशील होतो. पण अशा वेळीच सजग राहणे अधिक महत्त्वाचे ठरते.

आपण कोणावर अन्याय करत नाही ना? आपल्या वागण्यामुळे कोणाचे मन दुखावत नाही ना? आपण कोणावर हात उचलत नाही ना?-हे प्रश्न प्रत्येकाने स्वतःला विचारायला हवेत.

**समाज आणि संस्कारांची भूमिका :** कुटुंब आणि समाज हे व्यक्तीच्या वर्तनावर मोठा प्रभाव टाकतात. लहानपणापासूनच चांगले संस्कार दिले गेले, तर व्यक्ती जबाबदार आणि संवेदनशील बनते.

“इतरांशी जसे वागावे, तसेच ते आपल्याशी वागतील” हा साधा नियम जर प्रत्येकाने अंगीकारला, तर समाजात सौहार्द आणि शांतता निर्माण होईल.

“नशिबाचे भोग फिरून येतातच” हे वाक्य आपल्याला सतत सजग राहण्याची आठवण करून देते. जीवनात यशस्वी होण्यासाठी केवळ बुद्धिमत्ता किंवा मेहनत पुरेशी नाही; चांगले वर्तन आणि नैतिक मूल्येही तितकीच आवश्यक आहेत.

आज आपण जे करतो, त्यावर आपले उद्याचे आयुष्य ठरणार आहे. म्हणूनच, प्रत्येक कृती विचारपूर्वक करा, कोणाचे मन दुखावू नका, अन्याय टाळा आणि प्रेमाने वागा.

कारण शेवटी, नशिब आपल्याला आपल्या कर्मांचेच प्रतिबिंब दाखवते-आणि तेव्हा आपल्याकडे अभिमानाने उभे राहण्यासारखे काहीतरी असावे, हीच खरी जीवनाची कमाई आहे.

•••


## थोडक्यात पण महत्वाचे




### मॅरिएट बॉनवॉय तर्फे समर रिसॉर्ट ऑफर

पुणे (आरंभ पर्व) : मॅरिएट बॉनवॉय तर्फे मर्यादित काळासाठी भारतातील ५० हुन अधिक रिसॉर्ट डेस्टिनेशनसाठी समर रिसॉर्ट ऑफर सादर केली आहे. ३० जून २०२६ पर्यंत सुरु राहणाऱ्या या ऑफर अंतर्गत मॅरिएट बॉनवॉय सदस्यांना रूम रेट्स वर अतिरिक्त १० टक्के सवलतीची तसेच खाद्य पदार्थ आणि पेयांवर २० टक्के बचतीची संधी मिळू शकेल. ही ऑफर १ मे ते ३० जून २०२६ दरम्यानच्या राहण्यावर (स्टे) उपलब्ध आहे.

### ल मेरिडियन सुरत सुरू



पुणे (आरंभ पर्व) : मॅरिएट बॉनवॉयच्या जागतिक पोर्टफोलिआचा भाग असलेल्या ल मेरिडियन हॉटेल्स अॅन्ड रिसॉर्ट्स् तर्फे ल मेरिडियन सुरत सुरू करण्याची घोषणा करण्यात आली. हे सुरतमधील पहिले ल मेरिडियन हॉटेल असून गुजरातमधील दुसरे आहे. सुरत आंतरराष्ट्रीय विमानतळापासून केवळ तीन किमी अंतरावर असलेल्या या हॉटेलमध्ये सुरतच्या हिरे व वस्त्रोद्योग वारसापासून प्रेरित सुटससह कलात्मक नक्षीकाम असलेल्या 185 गेस्ट रूम्स आहेत.

### सुरांनी भारावले प्रेक्षक, रफींच्या आठवणींना सुरेल अभिवादन

पुणे (आरंभ पर्व) : मोहम्मद रफी यांच्या अमर स्वरांना वंदन करणारा "रफीनामा" हा सुरेल कार्यक्रम कोथरूड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात दिमाखात पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात "सुहानी रात ढल चुकी" या भावस्पर्शी गीताने होताच सभागृहात शांतता आणि सुरांचे अद्भुत वातावरण निर्माण झाले. त्यानंतर "तेरी आंखों के सिवा", "क्या हुआ तेरा वादा", "चौदहवी का चांद" आणि "न जा कहीं अब ना जा" या गीतांनी रसिकांना अक्षरशः भूतकाळातील सुवर्णकाळात नेले. गायक राजेश दातार यांनी रफींच्या गायकीचा आत्मा जपत सादरीकरण केले, तर गायिका अनघा नवरे यांनीही आपल्या मधुर आवाजाने कार्यक्रमाला सुंदर साथ दिली.

# 'झेंडा मराठीचा..मराठी भाषेच्या..मराठी कर्तृत्वाचा'

## विश्वमंगल मराठी फाउंडेशनचा महाराष्ट्र दिनी आळंदी येथे भव्य शुभारंभ

**पिंपरी-चिंचवड (दै. आरंभ पर्व)**

मराठी भाषा, संस्कृती आणि परंपरेचा जागतिक स्तरावर प्रचार-प्रसार करण्याच्या उद्देशाने स्थापन करण्यात आलेल्या 'विश्वमंगल मराठी फाउंडेशन' या नव्या व्यासपीठाचा भव्य शुभारंभ महाराष्ट्र दिनी, शुक्रवार, १ मे २०२६ रोजी सकाळी १० वाजता आळंदी येथे होणार आहे.

संत श्री ज्ञानेश्वर माऊलींच्या पवित्र सान्निध्यात फ्रुटवाले धर्मशाळा येथे हा सोहळा पार पडणार असून, या फाउंडेशनची संकल्पना माजी मंत्री व आमदार सुभाष बापू देशमुख यांनी मांडली आहे. तेच या संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष असून, मराठी भाषा आणि उद्योजकतेला जागतिक व्यासपीठ मिळवून देण्याच्या दृष्टीने

**• कार्यक्रम तपशील •**

**दिनांक : शुक्रवार, १ मे २०२६**

**वेळ : सकाळी १०.०० वा.**

**स्थळ : फ्रुटवाले धर्मशाळा, आळंदी, जि. पुणे**

त्यांनी हा उपक्रम हाती घेतला आहे. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेच्या ६६ व्या वर्धापनदिनी होत असलेल्या या शुभारंभ सोहळ्यास ज्येष्ठ निरूपणकार व प्रख्यात वक्ते विवेकजी घळसासी हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणार आहेत. याशिवाय विविध क्षेत्रातील मान्यवर, उद्योजक, सामाजिक कार्यकर्ते आणि शिक्षणतज्ज्ञ मोठ्या संख्येने सहभागी



होणार आहेत. 'झेंडा मराठीचा... मराठी भाषेचा... मराठी कर्तृत्वाचा' हे फाउंडेशनचे घोषवाक्य असून, मराठी समाजाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी कार्य करण्याचा संस्थेचा निर्धार आहे. संत ज्ञानेश्वरांच्या ७५० व्या जयंतीच्या पार्श्वभूमीवर 'ज्ञानेश्वरी'तील विचार आणि 'पसायदान'मधील विश्वकल्याणाचा संदेश जगभर पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण ध्येय फाउंडेशनने ठेवले आहे. यासोबतच मराठी शाळांचे पुनरुज्जीवन, भाषा व संस्कृतीचे जतन-संवर्धन, तसेच जागतिक स्तरावर विखुरलेल्या मराठी समाजाला एकत्र आणून संवाद, सहकार्य आणि ज्ञानविनिमयासाठी व्यासपीठ निर्माण करणे हे संस्थेचे प्रमुख उद्दिष्ट आहे. शिक्षण, उद्योग आणि सामाजिक क्षेत्रातील मराठी व्यक्तींना एकत्र आणून राज्याच्या औद्योगिक विकासालाही चालना देण्याचा मानस आहे. फाउंडेशनची रचना जागतिक पातळीवर करण्यात आली असून, शिखर कार्यकारी समिती, देशपातळीवरील समित्या आणि महाराष्ट्रातील विभागीय समित्यांच्या माध्यमातून कार्य समन्वय साधला जाणार आहे. शुभारंभ कार्यक्रमानिमित्त उद्योजकीय परिसंवादाचेही आयोजन करण्यात आले आहे. या परिसंवादात डॉ. संजय वायाळ, अप्पासाहेब कोंढारे (दुबई) आणि उदय भोसले (लंडन) यांसारखे मान्यवर मार्गदर्शन करणार असून, नवउद्योजकांना जागतिक संधी, नेटवर्किंग आणि उद्योग उभारणीसाठी दिशा देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. डिजिटल माध्यमातून जागतिक संपर्क प्रस्थापित करत परिषद, चर्चासत्रे आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्याचा संस्थेचा मानस आहे. तसेच देश-विदेशातील महाराष्ट्र मंडळे आणि विविध संस्थांशी सहकार्य वाढवून पारदर्शक कार्यपद्धती राबवली जाणार आहे. मराठी अस्मिता बळकट करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या या ऐतिहासिक सोहळ्यास उपस्थित राहण्याचे आवाहन फाउंडेशनतर्फे सर्व मराठी भाषिकांना करण्यात आले आहे.

# कॅलिफोर्निया बदामांसोबत प्रत्येक सुपर क्षणाचा अनुभव घ्या

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

या क्रिकेट हंगामात, कॅलिफोर्निया बदाम आपल्या 'सुपर यू विथ सुपरफूड्स' या नवीनतम मोहिमेद्वारे क्रिकेटचा उत्साह आणि बदामांची पौष्टिक शक्ती एकत्र आणत आहेत. व्हिटॅमिन ई, फायबर, मॅग्नेशियम आणि प्रथिने यांसारख्या २४ आवश्यक पोषक तत्वांनी समृद्ध असलेले बदाम एक उत्तम सुपरफूड आहेत, जे मैदानावर आणि मैदानाबाहेर दीर्घकाळ टिकणारी ऊर्जा आणि सर्वोत्तम कामगिरीसाठी मदत करतात. या मोहिमेच्या केंद्रस्थानी एक मोबाईल-फर्स्ट संवादात्मक स्पर्धा आहे, जी भारतातील सहभागींना थेट क्रिकेटचा उत्साह आणि बदामांच्या फायद्यांचा शोध एका आकर्षक आणि प्रभावी पद्धतीने एकत्र करण्याची संधी देते. २७ एप्रिल ते २४ मे पर्यंत चालणाऱ्या या अनुभवात, जे सहभागी संपूर्ण क्रिकेट हंगामात सातत्यपूर्ण सहभाग आणि सक्रियता टिकवून ठेवतात, त्यांना पुरस्कृत केले जाते. सोपा वापर आणि सहज नेव्हिगेशनसह डिझाइन




केलेल्या या प्लॅटफॉर्मवर, सहभागी थेट क्रिकेट सामन्यांदरम्यान त्यांच्या मोबाईल फोनवरून AlmondWin.com ला भेट देऊन, काही मूलभूत तपशील आणि OTP पडताळणीसह नोंदणी करू शकतात—अॅप डाउनलोड करण्याची आवश्यकता नाही. लॉग इन केल्यावर, वापरकर्ते कॅमेरा अॅक्सेस सक्षम करतात आणि एका ऑगमेंटेड रिॲलिटी अनुभवात प्रवेश करतात, जो त्यांच्या वास्तविक परिसराला आभासी घटकांसह जोडतो. अधिक माहितीसाठी, वापरकर्ते AlmondWin.com वर उपलब्ध असलेल्या सविस्तर FAQs चा संदर्भ घेऊ शकतात. थेट क्रिकेट सामन्यांच्या तालावर, जेव्हा सहभागी सामन्याच्या महत्त्वाच्या क्षणी त्यांचे फोन हलवतात, तेव्हा त्यांच्याभोवती आभासी बदाम दिसू लागतात आणि हा अनुभव जिवंत होतो. मग तो षटकार असो, एक नेत्रदीपक झेल असो किंवा सामन्याचे चित्र बदलणारा निर्णायक क्षण असो, वापरकर्ते त्यांच्या स्क्रीनवर दिसणाऱ्या बदामांवर टॅप करून सहभागी होऊ शकतात. चौकार, झेल किंवा महत्त्वपूर्ण कामगिरी यांसारख्या क्षणांमध्ये सोनेरी बदाम दिसतात, तर संपूर्ण सामन्यादरम्यान चांदीचे बदाम दिसतात. प्रत्येक टॅप केलेला बदाम सहभागीच्या स्कोअरमध्ये भर घालतो आणि त्वरित लहान बदामाचे फायदे अनलॉक करतो, ज्यामुळे प्रत्येक संवाद आकर्षक आणि माहितीपूर्ण बनतो. सहभागी अनेक थेट क्रिकेट सामन्यांमध्ये भाग घेऊन त्यांचे स्कोअर वाढवू शकतात आणि 'बदामाच्या फायद्यांचा' संग्रह पूर्ण करू शकतात. अधिक स्पर्धकांना जिंकण्याची संधी देण्यासाठी लीडरबोर्ड दर आठवड्याला रीसेट केला जातो; स्पर्धेदरम्यान एकूण गुण वाढत जातात, ज्यामुळे सक्रिय राहणाऱ्या स्पर्धकांना बक्षीस मिळते. प्रत्येक आठवड्यातील सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्यांना लोकप्रिय क्रिकेट सामन्यांची तिकिटे जिंकण्याची संधी असते, तर सर्वाधिक एकूण गुण मिळवणारे आणि आपले सर्व फायदे पूर्ण करणारे स्पर्धक 'महाबक्षीस' - अंतिम सामन्याच्या तिकिटांसाठी पात्र ठरतात.



# सामाजिक कार्यकर्त्याच्या पश्चात मदतीला सरसावला मित्रपरिवार

**राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)**

खेड तालुक्यातील कडूस येथील सामाजिक काम करणाऱ्या स्वयंसेवी कार्यकर्त्याचे आकस्मिक निधन झाले, कुटुंबाचा मुख्य आधार हरपला. परंतु, स्व. सचिन रामचंद्र शिंदे या तरुणाचे सामाजिक कामच त्याच्या मृत्यू पश्चात त्याच्या कुटुंबियांच्या मदतीला धावून आले. सामाजिक कार्य करताना जोडलेल्या मित्रपरिवार व नातेवाईकांनी त्यांच्या दशक्रिया विधीच्या दिवशी एक लाख रुपयांची आर्थिक मदत कुटुंबाकडे सुपुर्द केली. सचिन रामचंद्र शिंदे यांचे वयाच्या

**• स्व. सचिन शिंदे यांच्या कुटुंबाला आर्थिक मदतीचा हात**

केवळ ४८ व्या वर्षी आकस्मिक निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी व मुलगा असा परिवार आहे. सचिन हे कुटुंबाचा मुख्य आधार होते. घरातील कर्ता पुरुष अचानक गेल्याने कुटुंबावर मोठी आपत्ती कोसळली. सचिन हे विमा प्रतिनिधी म्हणून काम करून कुटुंबाचा चरितार्थ चालवत होते. हे करीत असताना ते सामाजिक कार्यात नेहमी अग्रेसर होते.

# चार वर्षांच्या मुलाच्या पोटातून टूथपिक काढण्यात यश

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

नोबल हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर येथील डॉक्टरांच्या टीमने एका चार वर्षांच्या मुलाच्या पोटातून टूथपिक यशस्वीरीत्या काढले. याबाबत अधिक माहिती देताना नोबल हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटरचे कन्सल्टंट गॅस्ट्रोएन्टेरोलॉजिस्ट डॉ.प्रमोद कटारे म्हणाले की, हडपसर परिसरात राहणाऱ्या चार वर्षांच्या मुलाला त्याच्या पालकांनी उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले. त्याच्या पोटात तीव्र वेदना होत होत्या. सीटी स्कॅन केल्यानंतर पोटाच्या वरच्या भागात (फंडस) टूथपिक अडकली असल्याचे दिसून आले. टूथपिकची दोन्ही टोके पोटाच्या भिंतींमध्ये अडकून फसले होते. डॉ.कटारे म्हणाले की, अनेकदा पोटात गेलेल्या वस्तू सुरक्षितपणे शरीराबाहेर काढता येतात किंवा बाहेर पडतात,मात्र टूथपिकसारख्या तीक्ष्ण वस्तूंमुळे आतड्यांना छिद्र पडण्याचा किंवा रक्तस्त्राव होण्याचा धोका अधिक असतो. त्यामुळे अशा वस्तू आढळल्यास तातडीने एंडोस्कोपीद्वारे त्यांना बाहेर काढणे आवश्यक असते. या मुलाच्या स्थितीमध्ये एंडोस्कोप घशावाटे पोटात टाकून टूथपिक काढण्यात आले. टुथपिकमुळे झालेल्या छिद्रामुळे काही काळ रक्तस्त्राव झाला, मात्र तो लवकरच थांबला.

डॉक्टरांच्या टीममध्ये डॉ.प्रमोद कटारे आणि भूलतज्ज्ञ डॉ.प्रतीक कदम यांचा समावेश होता.उपचारानंतर मुलाला दुसऱ्याच दिवशी घरी सोडण्यात आले असून त्याची प्रकृती सध्या उत्तम आहे. नोबल हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर येथील ईमर्जन्सी व ट्रॉमा विभागाचे प्रमुख डॉ.प्रथमेश राऊत म्हणाले की, अशा प्रकारच्या तीक्ष्ण वस्तू शक्यतो लहान मुलांना पोहचता येणार नाही अशा उंचीवर असलेल्या कपाटांमध्ये ठेवाव्यात.

# ज्याच्यावर बंदी त्याचीच भारतात जास्त विक्री

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारतात एखाद्या गोष्टीवर बंदी घातली की तीच गोष्ट अधिक प्रमाणात विकली जाते, हे एक कटू पण वास्तव चित्र आहे. कायद्याने प्रतिबंध घातल्यावर त्या वस्तूंची उपलब्धता कमी व्हायला हवी, अशी अपेक्षा असते; परंतु प्रत्यक्षात अनेक वेळा उलट घडताना दिसते. ही विसंगती केवळ कायद्याच्या अंमलबजावणीतील त्रुटी दाखवत नाही, तर समाजातील मानसिकतेचाही आरसा ठरते. बंदी घालण्यामागचा उद्देश साधारणपणे जनहिताचा असतो. आरोग्यास हानिकारक पदार्थ, पर्यावरणाला नुकसान करणाऱ्या वस्तू किंवा सामाजिकदृष्ट्या घातक गोष्टींवर निर्बंध आणले जातात. मात्र, या बंदीमुळे काही लोकांच्या मनात त्या गोष्टींबद्दल अधिक आकर्षण निर्माण होते. "ज्यावर बंदी आहे, तेच खास" असा एक वेगळाच मानसिक कल तयार होतो. परिणामी, मागणी कमी होण्याऐवजी वाढते. यामागे



**शाईचा प्रवास | प्रतिक गंगणे**

काळाबाजार आणि बेकायदेशीर जाळ्यांची मोठी भूमिका असते. बंदीमुळे अधिकृत विक्री थांबली तरी, गुप्त मार्गाने पुरवठा सुरू राहतो. उलट, या वस्तूंना "दुर्मिळ" किंवा "विशेष" अशी छटा मिळाल्यामुळे त्यांची किंमतही वाढते. यामुळे काही लोकांसाठी हा व्यवसाय अधिक फायदेशीर ठरतो आणि बेकायदेशीर विक्रीला चालना मिळते.

कायद्याची अंमलबजावणी ही देखील एक महत्त्वाची बाब आहे. जर नियम कठोर असले तरी त्यांची अंमलबजावणी कमकुवत असेल, तर बंदीचा अपेक्षित परिणाम होत नाही. भ्रष्टाचार, मनुष्यबळाची कमतरता आणि नियंत्रण यंत्रणेतील त्रुटी यामुळे प्रतिबंधित वस्तू सहज उपलब्ध राहतात. याशिवाय, लोकांमध्ये जागरूकतेचा अभावही मोठे कारण आहे. केवळ बंदी घालून प्रश्न सुटत नाही; त्या गोष्टींचे दुष्परिणाम लोकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवणे आवश्यक असते. जेव्हा लोकांना स्वतःहून त्या गोष्टी टाळण्याची जाणीव होते, तेव्हाच खऱ्या अर्थाने बदल घडतो.

शेवटी, बंदी हा उपाय असला तरी तो पूर्ण उपाय नाही. शिक्षण, जनजागृती, कडक अंमलबजावणी आणि पर्यायी पर्याय उपलब्ध करून देणे या सर्व गोष्टी एकत्रितपणे राबवल्या तरच या समस्येवर मात करता येईल. अन्यथा "ज्यावर बंदी, त्यालाच मागणी" ही विसंगती कायम राहील आणि हेच खरे दुर्दैव आहे.







# 'भारताची भीमज्योत' बाबासाहेबांचे संविधान मजबूत करणारी

## रामदास आठवले यांचे प्रतिपादन; भाजप अनुसूचित जाती मोर्चाच्या वतीने 'भारताची भीमज्योत' उपक्रम

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

"संविधानाचे शिल्पकार बाबासाहेब आंबेडकर हे खऱ्या अर्थाने लोहपुरुष, शक्तिपुरुष व द्रष्टे नेते होते. बाबासाहेबांच्या विचारांवर आणि संविधानाच्या तत्वांवर पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस कार्य करीत आहेत. भाजपने सर्व समाजाला सोबत घेऊन 'सबका साथ, सबका विकास' ही भूमिका मांडली असून, बाबासाहेबांचे संविधान मजबूत करण्यासाठी दीक्षाभूमी ते चैत्यभूमी असा प्रवास करत निघालेली ही भीमज्योत अवघ्या विश्वाला प्रकाशाची वाट दाखवेल,"




असे प्रतिपादन केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी केले. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त भाजप अनुसूचित जाती मोर्चा, महाराष्ट्र प्रदेशच्या वतीने प्रदेशाध्यक्ष विश्वजित अनिलकुमार गायकवाड यांच्या संकल्पनेतून 'भारताची भीमज्योत' दीक्षाभूमी ते चैत्यभूमी, बाबासाहेबांच्या स्वप्नातील भारताचा अनुभव देणाऱ्या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. गंज पेठेतील सावित्रीबाई फुले स्मारकात झालेल्या या कार्यक्रमावेळी रामदास आठवले बोलत होते. प्रसंगी माजी मंत्री भाई गिरकर, उपमहापौर परशुराम वाडेकर, भाजप शहराध्यक्ष धीरज घाटे, माजी खासदार सुनील गायकवाड, 'रिपाइं'चे शहराध्यक्ष संजय सोनावणे, नगरसेवक अजय खेडेकर, पल्लवी जावळे, मनीषा लडकत, अमर आवळे, नंदा आबनावे, प्रियांका शेंडगे, अर्चना जगताप, हर्षदा भोसले, वीणा घोष, निलेश आल्हाट यांच्यासह पुणे व पिंपरी-चिंचवड येथील पदाधिकारी उपस्थित होते. रामदास आठवले म्हणाले, "दलित, सवर्ण व बहुजन समाजाला एकत्र आणण्यासाठी माझा प्रयत्न आहे. बुद्धाचे तत्वज्ञान अंगीकारत बाबासाहेबांनी संपूर्ण मानवजातीचे कल्याण करणारे संविधान देशाला दिले. संविधान कोणीही बदलू शकत नाही. काँग्रेस आणि विरोधी पक्ष केवळ तशा वावड्या उठवत आहे. मात्र, चैत्यभूमीवर भव्य स्मारक साकारण्यात नरेंद्र मोदी आणि देवेंद्र फडणवीस यांनीच पुढाकार घेतल्याचे आपण पाहिले. विश्वजित गायकवाड यांच्यासारख्या युवकाला पाठबळ देण्याचे काम भाजप करीत आहे. मी ज्यांच्यासोबत असतो, त्यांची सत्ता आल्याशिवाय राहत नाही. जोवर मी भाजपसोबत आहे, तोवर भाजपाची सत्ता येणार असून, मला चौथ्यांदा मंत्री होण्याची संधी मिळणार आहे." "पश्चिम बंगालमध्ये भाजपची सत्ता येणार आहे. ममता बॅनर्जी व अन्य नेत्यांनी पराभव स्वीकारून जिंकून येणाऱ्या भाजपचे अभिनंदन करायला हवे. देशात महिलांना ३३ टक्के आरक्षण देण्यासाठी एनडीए सरकार कटिबद्ध असून, पुढील काळात याबाबत जागृती करून हे विधेयक पारित करू.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.